श्रीम.दर्शना राजेंद्र सातदिवे, पशुधन पर्यवेक्षक पशुवैद्यकीय दवाखाना दाढ बु, पंचायत समिती राहता यांचेविरुध्द कार्यालयीन कामी अनधिकृत गैरहजर असलेने त्यांना जिल्हा परिषद सेवेतुन निलंबित करणेबाबत.

अहिल्यानगर जिल्हा परिषद
पशुसवर्धन विभाग
जि प आदेश जा क्रं पसं/आस्था-1/552/2025
अहिल्यानगर दि. 25/07/2025.

संदर्भ :- 1) मा.आयुक्त पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य् पुणे यांचेकडील अहवाल दिनांक 25/07/2025
2) मा.प्रादेशिक सहआयुक्त् (पशु व दुग्धव्यवसाय ) नाशिक विभाग नाशिक यांचेकडील अहवाल दिनांक.25/07/2025
3) महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 मधील नियम क्रं.(3) (1) (अ)

उपरोक्त संदर्भ क्रं 1 व 2 अन्वये अन्वये श्रीम.दर्शना राजेंद्र सातदिवे, पशुधन पर्यवेक्षक पशुवैद्यकीय दवाखाना दाढ बु, पंचायत समिती राहाता यांचेविरुध्द कार्यालयीन कामी अनधिकृत गैरहजर राहणे, लम्पी चर्मरोगाने बाधीत परिसरात प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेची कार्यवाही न करणे या प्रकारचे गैरवर्तणूक बाबत कळवलेले आहे.

श्रीम.दर्शना राजेंद्र सातदिवे, पशुधन पर्यवेक्षक पशुवैद्यकीय दवाखाना दाढ बु, पंचायत समिती राहाता यांचे उपरोक्त वर्तनामुळे जिल्हा परिषदेची प्रतिमा मलिन झाली आहे.श्रीम.दर्शना राजेंद्र सातदिवे, पशुधन पर्यवेक्षक पशुवैद्यकीय दवाखाना दाढ बु, पंचायत समिती राहाता यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम 1967 मधील नियम 3 चा भंग केलेने सबंधितावर शिस्तभंगविषयक कारवाई प्रस्तावित करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 चे नियम (3) (1) (अ) मधील तरतुदीस अधीन राहुन मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन या आदेशाव्दारे उक्त श्रीम.दर्शना राजेंद्र सातदिवे, पशुधन पर्यवेक्षक पशुवैद्यकीय दवाखाना दाढ बु, पंचायत समिती राहाता यांना सदर आदेश बजावलेच्या दिनांका पासुन जिल्हा परिषद सेवेतुन निलंबित करीत आहे.

आणखी असाही आदेश देण्यात येत आहे की, हा आदेश अंमलात राहील तेवढया कालावधीत श्रीम.दर्शना राजेंद्र सातदिवे, पशुधन पर्यवेक्षक पशुवैद्यकीय दवाखाना दाढ बु, पंचायत समिती राहाता यांचे मुख्यालय पंचायत समिती ---------------कोपरगाव--------------- येथे राहील.

श्रीम.दर्शना राजेंद्र सातदिवे, पशुधन पर्यवेक्षक यांना गट विकास अधिकारी,पंचायत समिती----कोपरगाव यांच्या पुर्वपरवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

श्रीम.दर्शना राजेंद्र सातदिवे, पशुधन पर्यवेक्षक पशुवैद्यकीय दवाखाना दाढ बु, पंचायत समिती राहाता यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढुन टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम 1981 मधील नियम 68 च्या तरतुदीनुसार निलंबन भत्ता व पुरक भत्ते देण्यात यावेत. निलंबनाच्या कालावधीत श्रीम.दर्शना राजेंद्र सातदिवे, पशुधन पर्यवेक्षक यांनी खाजगी नोकरी स्वीकारु नये त्यांनी तसे केल्यास ते दोषारोप त्यांचेवर ठेवण्यात येईल व ते निलंबन निर्वाह भत्ता गमाविण्यास पात्र ठरतील.

निलंबनाचे कालावधीत निलंबन निर्वाह भत्ता जेव्हा देण्यात येईल, त्या वेळी आपण खाजगी नोकरी स्वीकारली नाही अथवा कोणताही खाजगी धंदा वा व्यवसाय करीत नाही अशा आशयाचे प्रमाणपत्र श्रीम.दर्शना राजेंद्र सातदिवे, पशुधन पर्यवेक्षक यांनी सादर करावे. तसेच निलंबनाचे कालावधीत श्रीम.दर्शना राजेंद्र सातदिवे, पशुधन पर्यवेक्षक यांना निलंबन निर्वाह भत्ता देण्याबाबतची कार्यवाही गट विकास अधिकारी,पंचायत समिती, ----------कोपरगाव---------- हे करतील.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेताक क्रं.202507251100 55 असा आहे.

( आनंद भंडारी भाप्रसे )
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्रीम.दर्शना राजेंद्र सातदिवे, पशुधन पर्यवेक्षक पशुवैद्यकीय दवाखाना दाढ बु, पंचायत समिती राहाता व्दारा व प्रत- गट विकास अधिकारी,पंचायत समिती राहाता

2/-सदर आदेश संबधितास तात्काळ बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.

प्रत- मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर.
प्रत- गट विकास अधिकारी,पंचायत समिती ------कोपरगाव------
प्रत- मुळ संचिका

( आनंद भंडारी भाप्रसे )
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर